
'टेप'च्या युगाचा आरंभ

१९४१ ते ५० या कालखंडात जागतिक पातळीवरही बऱ्याच घडामोडी झाल्या. युरोपात पेटलेल्या दुसऱ्या महायुद्धाची अखेर या दशकात झाली. या विनाशकारी युद्धामुळे जगात बऱ्याच उलथापालथी झाल्या. त्याची झळ मुंबई शहरासही पोहोचली. जागांची भाडी वाढून पागडी पद्धतीला सुरुवात झाली. स्वस्थचित्त व शांतपणे जगणाऱ्या मुंबैकराला महागाईची झळ जाणवू लागली. दुसऱ्या महायुद्धामुळे दळणवळण, रेडियो, बिनतारी संदेश यंत्रणा आदि बऱ्याच नवीन गोष्टींनी प्रवेश केला. सैनिकांच्या करमणुकीसाठी वाहून नेता येतील असे, विजेवर / बॅटरीवर चालणारे रेकॉर्डप्लेअर्स, न फुटणाऱ्या व



दीर्घकाळ वाजणाऱ्या ध्वनिमुद्रिका यांच्यावर संशोधन चालू होते व काही प्राथमिक अवस्थेतील यंत्रे पण उपयोगात येऊ लागली होती. सर्वात महत्त्वाचे म्हणजे विद्युतचुंबकीय ध्वनीफिती (टेपस) व सुटसुटीत आकारांचे टेपरेकॉर्डस् युरोप, अमेरिकेत सर्रास वापरात येऊ लागले. पूर्वी रेडिओवर दोन फूट व्यासाच्या मोठ्या ध्वनिमुद्रिका वापरात होत्या. त्यांना 'तवे' म्हणत. ८/१० वेळा वाजवले की ते फेकून द्यावे लागत. किंवा पुसून टाकून नव्यानं वापरात येतं. टेपरेकॉर्डर्समुळे तासा/दीडतासाचं सलग मुद्रण करता येऊ लागलंय. हवा तो भाग काढून टाकणे, टेप पुसून तिच्यावरच नवीन मुद्रण करणे या गोष्टींमुळे ही मशीन्स रेडिओ स्टेशनांमध्ये चखून रूळली.


समाजामधल्या मध्यम व उच्चमध्यम वर्गात व श्रीमंतांकडे टेपरेकॉर्डर्स येऊन स्थिरावले. घरबसल्या मैफिली ऐकण्याची सवय झाली. हाच वर्ग ग्रामोफोन रेकॉर्डसचा मोठा खरेदीदार होता. त्यानंच पाठ फिरवायला सुरुवात केल्यावरती कधी नव्हे ते ग्रामोफोन कंपनीला जबरदस्त मंदीला तोंड द्यावं लागलं. टेपरेकॉर्डर्सचं तंत्र ग्रामोफोन कंपनीतही येऊन पोचलं पण त्यामुळे कंपनीचा फायदा होण्याऐवजी नुकसानच होऊ लागलं.

परिणामी नोकरवर्गात कपात करणं अनिवार्य बनलं. कर्मचाऱ्यांच्या पगारात ३०/४० टक्क्यांनी कपात करण्यात आली. त्यामुळे सुधीर फडके, स्नेहल भाटकर, दत्ता डावजेकर ही मंडळी सिनेसंगीताच्या क्षेत्रात शिरली तर अभ्यंकरांसारखी माणसं रेडियोत! जी. एन. जोशी मात्र अखेरपर्यंत कंपनीत होते व चढउतार बघतच निवृत्त झाले.

तिकडे चित्रपटांच्या / बोलपटांच्या सृष्टीतही याचे पडसाद उमटले. पूर्वीची चित्रपटनिर्मितीची संस्था पद्धत (स्टुडिओ) हळूहळू मोडू लागली व काही सन्माननीय अपवाद सोडता बंदच पडली. काळाबाजारवाले / सटोडिये यांच्या हातात युद्धकाळात अफाट पैसा आला त्यामुळे कोणीही सोम्या-गोम्या उठून चित्रपटनिर्माता बनू लागला. पूर्वी चित्रपटनिर्मिती करणाऱ्या संस्थांमध्ये पगारी नोकर म्हणून काम करणारे गीतकार / संगीतकार व गायकमंडळी आता स्वतंत्रपणे फ्री-लान्स पद्धतीने काम करू लागले. आपापल्या पात्रतेनुसार मनात येईल ती किंमत वसूल करू लागले. मोजकीच वाद्ये वापरून कर्णमधुर संगीत देणारी मंडळीच प्रचंड वाद्यवृंद वापरू लागली व या वाद्यवृंदाच्या आकारावरून संगीतकाराचं मोठेपण ठरायचे दिवस आले.

पूर्वी चित्रपटगीत चित्रीकरणाकरिता सेटवर एकदा व रेकॉर्डकरता ग्रामोफोन कंपनीच्या स्टुडिओत दुसऱ्यांदा करावं लागे. त्याकरिता ग्रामोफोन कंपनीतर्फे पगारी वादकही होते. टेपरेकॉर्डर्समुळे ही स्टुडिओतली कलाकारमंडळी बेकार झाली कारण संगीतकार गीताची टेप बनवून पाठवू लागले.

ग्रामोफोन कंपनी हे सर्व बदल तटस्थपणे पाहू शकत नव्हती. चुंबकीय ध्वनिफीती लाखेच्या ध्वनिमुद्रिकांना मागे टाकणार हे स्पष्ट होतं. पण जुनं टाकूनही देता येत नव्हतं. तशात चित्रपटगीतांचा सुवर्णकाळ जवळ येत होता. पन्नाशीत पोचलेल्या ग्रामोफोन कंपनीला व्यवसायातील अडचणी, तेजी-मंदीचा प्रताप काही नवीन नव्हते. याचे हादरे दुसरे महायुद्ध सुरू होण्याच्या काळापासूनच बसायला सुरुवात झाली होती. त्यामुळे ग्रामोफोनव्यतिरिक्त आणखीही काही वस्तूंचं उत्पादन व विक्री करण्याकडे कंपनीचा कल वाढला.



फार पूर्वी म्हणजे स्थापनेच्या वेळी १८९८ मध्ये ग्रामोफोन कंपनीनं लॅंबर्ट कंपनीच्या टाईपरायटर्सचंही उत्पादन साईड लाईन म्हणून सुरू केलेलं होतं. त्यांच्या सुरुवातीच्या रेकॉर्ड लेबलवरती 'दि ग्रामोफोन अँड टाईपरायटर्स लि.' असं कोरलेलं आढळतं. संग्राहक मंडळी अशा ध्वनिमुद्रिकांना 'जी. अँड टी.' असं थोडक्यात संबोधतात. पुढे अर्थात ३/४ वर्षांत टाईपरायटर्स बनवणं थांबलं व लेबलवरूनही निघालं.

पण 'नावीन्या'चा व्यापारी तत्त्वावर उपयोग करून घ्यायचं धोरण पूर्वापारच चालू होतं. सुरुवातीपासूनच डमडम परिसरात ध्वनिमुद्रिकांबरोबर विविध आकारांचे ग्रामोफोन्स, त्यांच्या पेट्या, स्टीलच्या सुया; रेकॉर्डस् ठेवायच्या लाकडी पेट्या, डस्टर्स वगैरे मोठ्या प्रमाणावर बनवल्या जात. महोगनी, टीक साग यासारखं महागडं व टिकाऊ जातीचं लाकूड याकरिता वापरलं जाई व श्रीमंतांच्या दिवाणखान्यात डौलानं ही उत्पादनं मिरवत असत.

या मालिकेतच १९४०/४५ च्या सुमारास ग्रामोफोन कंपनीनं आणखी काही उत्पादनं आणली. रेडिओचा बोलबाला खूपच झालेला होता व खऱ्या अर्थानं भविष्यकाळात त्याचीच स्पर्धा निर्माण होणार होती. ते वेळीच ओळखून एच.एम.व्ही.नं चक्क रेडियो रिसिव्हर सेटस्‌चंच उत्पादन सुरू केलं. अर्थात सुरुवातीला बराच काळ युरोपातून - विशेषतः इंग्लंडमधूनच ही उपकरणं विकत आणली गेली, त्यांच्या जाहिराती स्थानिक वृत्तपत्रांमधून व रेकॉर्डस्‌च्या कॅटलॉग्जमधून प्रकाशित होऊ लागल्या. हे अर्थातच जुन्या काळचे व्हाल्वसेट होते. ट्रान्झिस्टरचा शोध पुढे १९४८ साली लागायचा होता. या रेडिओच्या जाहिराती फार आकर्षकपणे केल्या जात. सहा-सात व्हाल्व असलेल्या चार बॅंडच्या रेडिओतून जगभरातील रेडिओ केंद्रे ऐकता येतील असे भरघोस आश्वासन दिलेले असे व आवाजाच्या सुस्पष्टतेची ग्वाही! अडीचशे ते साडेतीनशे रुपयांपर्यंतच्या किमती 'सर्वांना' परवडण्यासारख्या आहेत असा दावापण केलेला आढळतो.

जुन्या कॅटलॉग्जमध्ये एच.एम.व्ही.च्या रेडिओशिवाय आणखीही उत्पादनांच्या गमतीशीर जाहिराती पाहायला मिळतात. त्यात एक आहे आईस्क्रीम बनवण्याकरिता लागणाऱ्या काउंटर फ्रीझरची. उणे दहा ते वीस तपमानाला ही यंत्रे काम करीत व दिवसाला ३२ गॅलन आईस्क्रीम इतके उत्पादन त्यात होत असे. त्याचप्रमाणे घरगुती किंवा कॅंटिन, हॉटेले वा क्लबच्या वापराकरिता बॉटल कूलर्सपण तयार केले जात. प्राथमिक अवस्थेतले ते एक प्रकारचे डीप फ्रीझरच होते म्हणाना! त्यामध्ये थंड पेयाच्या वा नाशिवंत मालाच्या बाटल्या..बुधले बुडवून ठेवायची मोठीच सोय करण्यात आलेली होती.

भारतासारख्या उष्ण कटिबंधातल्या प्रदेशामध्ये 'थंडावा' आणणारी ही उत्पादने लोकप्रिय होण्याची कंपनीला खात्री होतीच. पण 'नवीन' गोष्टींचा मागोवा घेण्याची वृत्तीपण होती. परीटघडीचे/ इस्त्रीचे कपडे वापरणे ही फॅशन रूढ होत चालली होती. कोळशाच्या अवजड इस्त्र्या वापरात असत.

गरीब मंडळी तांब्यात कोळसे टाकून तो वापरीत. अशा वेळी विजेवर चालणारी 'एच.एम.व्ही. कंट्रोल्ड हीट आयर्न' ग्रामोफोन कंपनीनं बाजारात पंचवीस रुपयांना आणली.

त्यामुळं कडक इस्त्रीचे कपडे घालून थंडपेय वा आईस्क्रीमचा आस्वाद घेत एचएमव्ही रेडिओ वा ग्रामोफोन रेकॉर्डस् ऐकायला रसिक मंडळी सज्ज होऊन बसू लागली..

सुरेश चांदवणकर
sschand@fifr.res.in